FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154151

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. पहिली खबर क्र. २७/२० वर्ष २०२० दिनांक १७/१२/२०२०
   State District Police Station FIR No. Year Date
2. (i) अधिनियम Act म.जु. कायदा १८८७, कलमे Sections ४, १२
   (ii) अधिनियम Act —, कलमे Sections —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —
3. (a) अपराधाची घटना वार ......, तारीख पासून १४/१२/२०२० वेळ ०८:०० वा. तारीख पर्यंत १७/१२/२०२० वेळ १८:१० वा.
   Occurrence of offence Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख १७/१२/२०२० वेळ १२:०० वा.
   Information received at P. S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेया सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. १२/२० तारीख १४/१२/२० वेळ १०:०५ वा
   General Diary Reference Entry No. Date Time
4. माहितीचा प्रकार Type of Information ......, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणचे नाव भारत पेट्रोलियम पेट्रोल पंप समोर, लिंक रोड, चारकोप नगर, ठिकाणाचे नंबर ......, गल्ली कांदिवली (प), रस्त्याचे नाव मुंबई ६७
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव भूषण प्रताप सिंह
   Name
   (b) वडिलांचे / पतीचे नाव स्व. कुमार सिंह
   Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ३४ वर्षे
   Date of Birth and Age
   (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ......
   Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ......, दिल्याचा दिनांक ......, दिल्याचे ठिकाण ...... (f) व्यवसाय ......
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता ......, गल्ली / सर्व्हे नं. ...... घर / नाव नं. ...... फोन / मो. नं. ...... पॅन नं. ...... वोटर्स नं. ......
   Address Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
   रस्त्याचे नाव लिंक रोड, जवळचे प्रसिद्ध ठिकाण हिंदुस्थान नाका, गाव ......, पोस्ट ......
   Road Nearest identifiable place Village Post
   तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......, सध्याचा पत्ता चारकोप, कांदिवली (प) मुंबई ६७
   Taluka Dist. State Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

१) भारत शिवाजी टेंबरे, वय ३९ वर्षे, धंदा नोकरी, पोलीस उपनिरीक्षक चारकोप पोलीस ठाणे, कांदिवली (प) मुंबई, रा. डि. एन. नगर पोलीस ऑफिसर्स कॉलनी, C/E, रूम नं १०७, डि. एन. नगर अंधेरी (प) मुंबई ५३

२) खाजगी इसम

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

फिर्यादी नामे भूषणप्रताप मुकुंदमुरारी सिंह रि. वय ३५ वर्षे यांनी सांगण्यावरून टंकलिखित केलेली फिर्याद हीच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(उमेश [illegible])
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

B. P. Singh
15/12/2020

दि. १६/१२/२०२०

**फिर्याद**

श्री. भुषणप्रताप मुकुंदमुरारी सिंह, वय ३५ वर्षे, धंदा – व्यवसाय ( सैनिक इंटेलिजन्स अँन्ड सिक्युरिटी प्रा.
लि. ), रा.ठि. सिंह निवास, हिन्दुस्थान नाका, एम.जी. रोड, चारकोप, कांदिवली, पश्चिम, मुंबई–४०० ०६७
मो. क्र.- ९७६८१४५८३९

-----

मी वरीलप्रमाणे असुन नमुद पत्त्यावर जन्मापासून माझे कुटुंबियांसह रहावयास आहे. मी सन २०१९ पासुन
सैनिक इंटेलिजन्स अँन्ड सिक्युरिटी प्रा. लि. कंपनी या नावाने माझे वर नमुद घरातुन व्यवसाय करित आहे. सदर
व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नावर मी माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करीत आहे.

मला वर नमुद कंपनीचे नावाने बृहन्मुंबई महानगरपालिकाचे क्लीनर्स मार्शलचे कांदिवली पश्चिम या
विभागाकरिता कंत्राट मिळाले आहे. सदर कामाकरिता मी एकूण ३० कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. सध्या करोना मुळे
महाराष्ट्र शासनाने सर्व जनतेस तोडाला व नाकाला मास्क लावने बंधनकारक केले आहे. त्यामुळे विना मास्क फिरणार
लोकांविरूध्द कारवाई करण्याचे काम आमचे कंपनीकडे सोपविण्यात आलेले आहे. विना मास्क रस्त्यावर आढळणार
लोकाना कायदेशिर दंड करून त्याव्दारे जमा केलेली रक्कम मी महानगरपालिकाकडे जमा करत असता. दिनांक
११/१२/२०२० रोजी शुकवारी माझा कर्मचारी नामे आदित्य सावंत उर्फ टिना याने महावीर नगर, कांदिवली येथ विना
मास्क फिरणारे एका इसमास पकडले. (नमुद इसमाचे नाव माहित नाही). त्या इसमाने त्याचे बायकोचा भाऊ राजेश
बसिन उर्फ बाबा बसिन यास फोन केला असता, त्यावेळी बाबा बसिन याने टिना यास फोनवरुन शिवीगाळ करुन
धमकावले. त्यामुळे टिना याने सदर इसमास कोणताही दंड न घेता सोडून दिले.

राजेश बसिन उर्फ बाबा बसिन हा आमचे विभागातील गुंड प्रवृत्तीचा व्यक्ती आहे. त्यामुळे मी त्यास नावान
व चेहऱ्याने ओळखतो. शनिवार दिनांक १२/१२/२०२० रोजी रात्रौ ११.०० वा. राजेश बसिन उर्फ बाबा बसिन याचा
माझे मोबाईलवर फोन आला व फोनवरुन ते शिवीगाळ करु लागले. त्यानंतर ११.३० वा. ते एकटेच पुन्हा माझे राहते
घरी आले व सदर प्रकरणावरुन पुन्हा माझे बरोबर वादविवाद करुन शिवीगाळ केली. सदर वेळी ते नशेमध्ये होते.
त्यावेळी त्याना मी समजाविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ते निघुन गेले. त्यानंतर रात्रौ ०१.३० वा. राजेश बसिन उर्फ
बाबा बसिन हे त्यांचे सोबत अंदाजे २० लोकांना घेऊन सोबत पोलीस बिट मार्शलला घेवुन माझे घरी आले. सदर
वेळी त्यानी मी नशेच्या पदार्थाचे (चरस, गांजा, एम.डी.) ची विक्री करतो असे सदर बिट मार्शल पोलीसाना सांगुन
माझे गाडीची झडती घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे बीट मार्शलने माझे गाडीची झडती घेतली. परंतु काहीएक न
मिळाल्याने ते सर्वजण निघुन गेले.

त्यानंतर ०३.३० वा. पुन्हा राजेश बसिन हे त्यांचेसोबत ६ जणांना घेवुन माझे घरी आले व मोठ मोठयान
शिवीगाळ करु लागले. सदर वेळी माझे दोन्ही भाऊ घराबाहेर आले. त्यानंतर आमचे मध्ये बाचाबाची होवुन हातापाई
झाली. सदर वेळी राजेश बसिन याचे डोक्याला मार लागल्याने रक्तस्त्राव होवु लागल्याने आम्ही १०० क्रमांकावर
संपर्क साधुन पोलीस गाडी बोलुन घेतली. सदर वेळी आलेल्या पोलीसांनी मला व माझे दोन्ही भावांना ताब्यात घेवुन
चारकोप पोलीस ठाणे येथे आणले. त्यावेळी चारकोप पोलीस ठाणे येथे उपस्थित पोलीस उप निरीक्षक ढेबरे यांनी माझा
तसेच माझ्या भावांविरूध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक ९३०/२०२०, कलम १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६
भादवि सह कलम ३७ (३) महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करुन मला, माझा भाऊ बलदेव आणि
बलविन असे आम्हा तिघांना अटक केली. तसेच सदर गुन्हयात आमच्या समोर राहणाऱ्या गोलु नावाच्या इसमास व मी
ओळखत नसलेल्या आशिष सिंग नावाच्या इसमास देखिल गुन्हयात आरोपी म्हणून समाविष्ठ केले. त्यानतर आम्हा
तिघांना लॉकअप मध्ये टाकून दुसऱ्या दिवशी कोर्टात रिमांडकामी हजर केले. आम्हाला रात्रौ अटक केले त्यावेळीस
पोलिस उप निरीक्षक ढेबरे यांनी माझा तसेच माझ्या दोन्ही भावांच्या ताब्यातील मोबाईल जप्त करुन घेतले होते. तसेच
दुसऱ्या दिवशी आमच्या घरी जावून घरी लावण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. यत्रंणेचा डी.व्ही.आर. गुन्हयाचे तपासकामी
काढून घेतला होता.

समक्ष

(रमेश [illegible])
15/12/2020
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

B.P. Singh
15/12/2020

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

श्री. भूषणप्रताप मुकुंद मुरारी सिंह यांची दि. १४/१२/२०२० रोजीची फिर्याद पुढे चालू.....

दुसऱ्या दिवशी रिमांडकामी आम्हाला कोर्टात हजर केल्यावर मा. कोर्टाने आम्हाला जामीनावर सोडले. त्यानंतर आम्ही बॉन्ड भरणेकामी चारकोप पोलीस ठाणे येथे गेलो. सदर वेळी तेथील उपस्थित पोलीस अंमलदार याने आमचे बॉन्ड भरुन घेतल्यानंतर आम्ही सदर अंमलदाराकडे आमचे जप्त केलेल्या मोबाईल बाबत विचारणा केली असता, त्यांनी स्वतःचे मोबाईल वरुन पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांना संपर्क करुन आम्ही मोबाईल घेण्यास आलो असलेबाबत सांगितले असता, त्यांनी आमचे मोबाईल गुन्हयामध्ये जमा केले असल्याचे सांगुन, सदर मोबाईल कोर्टाकडून सोडुन घ्यावे लागतील असे फोनवर मला सांगितले.

त्यानंतर मी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे याचे परिचयाचे आमचे परिसरातील एका खाजगी इसमाशी संपर्क साधला व त्यांची भेट घेवुन, माझेवर नोंद केलेला गुन्हा तसेच आमचे जप्त केलेले मोबाईल बाबत माहिती दिली असता, त्यांनी स्वतःचे मोबाईलवरुन लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचेशि संपर्क साधला व बोलणे केले असता, लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांनी गुन्हयातील जप्त मोबाईल व डि. व्ही. आर. परत देण्यासाठी रोख रक्कम रु. २०,०००/– तसेच सदर गुन्हयात माझे वडीलांचे नाव नोंद न करण्याबाबत रोख रक्कम रु. २०,०००/– असे एकूण रु. ४०,०००/– तसेच एक ब्लेंडर प्राईड दारुची बाटली घेवुन दिनांक १४/१२/२०२० रोजी चारकोप पोलीस ठाणे येथे येण्यास सांगितले.

वर नमुद प्रमाणे मागणी केलेल्या रु. ४०,०००/– व दारुची बाटली हे लाच स्वरुपात लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांना दिनांक १४/१२/२०२० रोजी देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक १४/१२/२०२० रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई विभागात जावून तक्रार करण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे मी दिनांक १४/१२/२०२० रोजी दुपारी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवुन पो.नि. उमेश गौंड यांचेकडे लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचे विरुध्द स्वःहस्ताक्षरात हिंदीमध्ये तक्रार लिहुन दिली. पो.नि. उमेश गौंड यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचा समक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. त्यानंतर पो.नि उमेश गौंड हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे हजर पोलीस कर्मचारी याचे मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो. नि.उमेश गौंड, माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले.

त्यानंतर मी, पंच, पोनि गौंड, सपोआ देशमुख व पोलीस पथकासह चारकोप पोलीस ठाणे येथे जावुन लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांना समक्ष भेटुन माझे तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. त्याप्रमाणे पडताळणी कारवाईत सहभागी होणारे पंच, पोलीस अधिकारी व अंमलदार पथकासह कारवाईकरीता आवश्यक असणाऱ्या साधनसामुग्रीसह दोन पोलीस वाहनाने चारकोप इडस्ट्रीज इस्टेट येथे पोहचलो. स.पो.आ. देशमुख व पो.नि. उमेश गौंड यांनी पडताळणी कारवाई बाबतच्या योग्यत्या सुचना देवुन पो.नि. उमेश गौंड यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला. त्यानंतर पो.नि. उमेश गौंड यांनी माझे सोबत पंच श्री. जाधव यांना पाठविले. त्याप्रमाणे मी व पंच जाधव असे रिक्षाने चारकोप पोलीस ठाणे येथे लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांची भेट घेण्याकरीता रवाना झालो. मी चारकोप पोलीस ठाणे येथे पोहचल्यावर लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचे बाबत पोलीस ठाण्यात चौकशी केली असता ते पोलीस ठाणे हद्दीत गेले असल्याचे मला पोलीस ठाणेतील अमंलदारानी सांगुन त्यांना संपर्क करण्यास सांगितले. सदर वेळी मी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचे ओळखीचा खाजगी इसम यास त्यांचे मोबाईलवर संपर्क साधुन पोलीस ठाणेस आलो असल्याचे सागितले. त्यावेळे त्यांनी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांना संपर्क करुन ते कोठे आहेत याची माहिती देतो असे सांगितले. त्यानंतर थोडयावेळाने त्यांचा मला फोन आला व लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे हे मिलन स्वीट मार्ट येथे माझी भेट घेण्यास येणार असल्याचे सांगुन मला तेथे थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी मीलन स्वीट मार्ट

समक्ष,

( उमेश गौंड )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबधक विभाग, मुंबई

15/12/2020

येथे जावुन थांबलो. थोडया वेळाने मी संपर्क साधलेला लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचे ओळखीचा खाजगी इसम तेथे आला. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक ढेंबरे हे त्यांचे संफेद रंगाचे होंडाई कंपनीची क्रेटा गाडी क्र. एम.एच. ०२ ई झेड ०२०२ ने तेथे आले. सदर ठिकाणी पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांनी मला मागणी केलेल्या पैशासंदर्भात चर्चा झाली त्यावेळी मी त्यांना रु. २०,०००/- इतकीच रक्कम देणे शक्य असल्याचे सांगितले असता त्यांनी इतकी कमी रक्कम चालणार नाही. वडीलांचे देखील काम करायचे आहे असे सांगितले. त्यावर मी त्यांना वारंवार विनंती करून रु. २०,०००/- इतकीच रक्कम घेवून काम करून देण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांनी त्यास अनुमती दिली.. तेव्हा त्यांना मी थोडयाच वेळात पैशांची व्यवस्था करुन येतो असे सांगुन तेथुन निघुन पंचान सोबत पुन्हा रिक्षाने पोलीस वाहना जवळ आलो तेव्हा पोनि गौंड यांनी माझे बनियनला लावलेला व्हाईस रेकार्डर काढून तो बंद केला व स्वतःकडे घेतला व माझ्याकडे लोकसेवक ढेंबरे यांच्याशी भेट झाल्यानंतर झालेल्या संभाषणाबाबत चौकशी केली त्यावेळी मी लोकसेवका बरोबर झालेल्या संभाषणाची माहिती दिली. त्यानंतर पो.नि. गौंड व सपोआ देशमुख यांनी माझे व लोकसेवक ढेंबरे यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पंचांसमक्ष वाजवून ऐकले.

मी दिनांक १४/१२/२०२० रोजी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी संदर्भात पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने, दिनांक १४/१२/२०२० रोजी सापळापुर्व/सापळा कारवाई आयोजित करणार असल्याने, माझे वैयक्तिक बचतीमधुन लाचेची रक्कम रु. २०,०००/- (भारतीय चलनातील रु. २०००/- ची एक नोट, रु. ५००/- ची ३६ नोटा) सोबत घेवुन आलो होतो. सदर वेळी मी माझेकडील रक्कम रु. २०,०००/- (भारतीय चलनातील रु. २०००/- ची १ नोट व रु. ५००/- च्या ३६ नोटा) पो.नि. उमेश गौंड यांचेकडे दिले. तद्नंतर पो.नि. उमेश गौंड यांनी मी दिलेल्या सर्व नोटांचे पोलीस अंमलदारांमार्फत मोबाईल फोनद्वारे फोटो काढले. दरम्यान मला पंचासमक्ष ॲथ्रसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून अल्ट्रावायलेट लाईटचा वापर करून प्रत्याक्षिक करून दाखविले. तद्नंतर मी दिलेल्या नमुद नोटांच्या दोन्ही बाजूस अँथ्रेसिन पावडर लावून, सदर रक्कम माझे पॅन्टचे पुढील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत पो.नि. उमेश गौंड यांनी आम्हाला सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन करुन ठरल्या प्रमाणे मीलन स्वार्ट मार्ट येथे पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांची भेट घेण्यासाठी मी पंच श्री. जाधव यांचेसह रवाना झालो. लोकसेवकाने पैसे स्विकारल्या नंतर इशारा म्हणून सापळा पथकास समजण्यासाठी, मी उजव्या हाताने डोक्यावर हात फिरवून पथकास इशारा देण्याबाबत मला सुचना दिल्या. सदर ठिकाणी सापळा कारवाईत सहभागी होणारे अधिकारी व अंमलदार हजर होते. स.पो.आ. देशमुख व पो.नि. उमेश गौंड यांनी सापळा कारवाई बाबतच्या योग्यत्या सुचना दिल्या.

तद्नंतर पो.नि. उमेश गौंड यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला त्यानंतर मी व पंच श्री. जाधव एका रिक्षाने तसेच पो.नि. उमेश गौंड, सपोआ देशमुख, पोलीस पथक, पंच श्री. ढोणे असे वेगवेगळया दोन रिक्षाने माझे मागोमाग कोणालाही संशय येंणार नाही असे आले. मीलन स्वीट मार्ट येथे आल्यानंतर लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचे ओळखीचे इसम मला भेटले. थोडा वेळ वाट पाहिल्यानंतर सदर खाजगी इसमाने लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचेशी संपर्क साधला असता, लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांनी त्यांना भारत पेट्रोलियम पंप, लिंक रोड, कांदिवली पूर्व, मुंबई येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचे ओळखीचे इसम हे त्यांचे मोटार सायकलने भारत पेट्रोलियम, लिंक रोड, कांदिवली, पूर्व, मुंबई येथे जाण्यास निघालो असता, मी त्यांचे पाठोपाठ रिक्षाने भारत पेट्रोलियम पंप, लिंक रोड, कांदिवली, पूर्व मुंबई येथे पोहचलो. त्यावेळी पोलीस पथक देखिल आमचे पाठीमागून रिक्षाने आले व आमचे आजुबाजूला कोणाला संशय येणार नाही असे उभे राहिले. मी व लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचे ओळखीचा इसम असे दोघेजण

समक्ष,

(उमेश गौंड)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबधक विभाग, मुंबई

15/12/2020

INSPECTOR OF POLICE
ANTI-CORRUPTION BUREAU
MUMBAI

श्री. भूषणप्रताप मुकुंद मुरारी सिंह यांची दि. १४/१२/२०२० रोजीची फिर्याद पुढे चालू.....

बोलत उभे असताना, काहीवेळाने पोलीस उप निरीक्षक ढेंबरे हे संफेद रंगाचे होंडाई कंपनीची क्रेटा गाडी क्र. एम.एच. ०२ ई झेड ०२०२ ने तेथे आले. त्यावेळी त्यांनी मला कारमध्ये बसण्यास सांगितले असता, मी नमुद कारमध्ये बसलो व माझे कामासंदर्भात चर्चा केली.

लोकसेवक श्री. ढेंबरे यांनी मला पैशाबाबत विचारणा केली असता, मी माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशातील रूपये २०,०००/- (भारतीय चलनातील रु. २०००/- ची १ नोट व रु. ५००/- दराच्या ३६ नोटा) असलेले नोटांचे बडल त्यांना दिले. त्यांनी ते उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या नेसणीस असलेल्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवले व मला जाण्यास सांगितले. त्यानुसार मी कारच्या बाहेर येवून सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना दिसेल अशा पध्दतीने लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत उजव्या हाताने डोक्यावर हात फिरवून पुर्व नियोजित इशारा केला. त्यानंतर पंच व सापळा पथकातील अधिकारी आणि अंमलदार यांनी लागलीच नमुद कारच्या चारीही बाजुने घेरावा करुन लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांना अटकाव केला. त्यानंतर सपोआ देशमुख, पो.नि. उमेश गौंड यांनी लोकसेवक ढेंबरे यांना स्वत:ची ओळख सांगितली. त्यानंतर पो.नि. उमेश गौंड यांनी मला बोलावून माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून घेवून तो बंद करून स्वत:कडे ठेवला. त्यानंतर त्यांनी माझ्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, सदर रक्कम लोकसेवक श्री. ढेंबरे यांनी त्यांचे शर्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. लोकसेवक श्री. ढेंबरे यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम स्विकारली असल्याने नमूद पथकाने त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान पो.नि. गौंड यांचे सांगण्यावरुन लाचेची स्विकारलेली रक्कम पंच श्री. जाधव यांनी लोकसेवक श्री. ढेंबरे यांच्या शर्टच्या डाव्या खिशातून काढून घेवून त्यांच्या ताब्यात घेतली. त्यानंतर लोकसेवक ढेंबरे घेवून आलेली संफेद रंगाचे होंडाई कंपनीची क्रेटा गाडी क्र. एम.एच. ०२ ई झेड ०२०२ ची पो.नि. गौंड व पथकाने पंचांसमक्ष प्राथमिक पाहणी केली असता काहीही आक्षेपार्ह मिळून आले नाही. त्यानंतर तात्काळ मी, पंच, लोकसेवक ढेंबरे व पोलीस पथक दोन पोलीस वाहनांने चारकोप पोलीस ठाणे येथे आलो. तसेच लोकसेवक ढेंबरे घेवून आलेले संफेद रंगाचे होंडाई कंपनीची क्रेटा गाडी क्र. एम.एच. ०२ ई झेड ०२०२ ही गाडी पो.ना. ९६१२२५/चिरमाडे चारकोप पोलीस ठाणेस घेवून आले.

चारकोप पोलीस ठाणेस आल्यानंतर पोलीस ठाणे येथे कर्तव्यावर असलेले पो.नि. सातपुते यांना लोकसेवक ढेंबरे यांचेवर करण्यात आलेल्या कारवाईबाबत पोनि गौंड व सपोआ देशमुख यांनी माहिती दिली. व पुढील कारवाईकरीता पुरेशी जागा उपलब्ध करून देणेबाबत विंनती केली असता पो.नि. सातपुते यांनी पोलीस पथकास चारकोप पोलीस ठाणेतील पहिल्या मजल्यावरील पो.नि. प्रशांत लांघी यांचा कक्ष उपलब्ध करून दिला. त्यानंतर पोनि गौंड व पोलीस पथम यांनी पुढील आवश्यकती कारवाई केली.

तरी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांनी माझा व माझे भावाचे जप्त केलेले मोबाईल फोन, डि.व्ही.डी. व माझे वडीलाचे नाव गुन्हयात न नोंदविणेबाबत, माझेकडे ४०,०००/- इतक्या रक्कमेची मागणी केली व तडजोडी अंती रूपये २०,०००/- रक्कम स्विकारण्याचे कबुल करुन ती स्विकारली म्हणून माझी नमुद लोकसेवकाविरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

चारकोप पोलीस ठाणे येथील लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ढेंबरे यांचेशी माझे पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी आर्थिक देवाण-घेवाणीचा व्यवहार नाही.

माझा जबाब संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो मला हिंदीतून समजावून सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

(उमेश गौंड)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबधक विभाग, मुंबई

INSPECTOR OF POLICE
BUREAU
MUMBAI

15/12/2020

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे .................... नाहरकत

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ....................

Total Value of properties stolen / involved -

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ....................

Unnatural / Accidental Death Case No., if any -

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी हे पोउप निरीक्षक भारत शिवाजी देवडे नेमणूक चारकोप पोलीस ठाणे, यांनी फिर्यादी यांचे नोंद गुन्ह्यातील फिर्यादी व त्यांचे भावाचे जप्त मोबाईल व सिडीआर परत देण्याकरिता रुपये 40000/- इतक्या लाचेची फिर्यादी यांचे तक्रारीचे नाव सं. नोंदविणे करिता रुपये 40000/- इतक्या रक्कमेची मागणी केली व तडजोडी अंति रु. 20000/- स्विकारण्याचे कबूल करुन कायदेशीर परिश्रमाखेरीज रोख रुपये 20,000/- पारितोषण स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून भ्र.प्र. अधि. 1988 क. 7, 12 प्रमाणे गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक उमेश गोंड

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ....................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...................., जिल्हा ...................., राज्य ....................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank.............. No..............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................
District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant. B P Singh 15/12/2020

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in Charge, Police Station
संपूर्ण नाव Name उमेश गोंड
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ....................
Posting
Code No. of I. O. ....................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report